**L. A. BILL No. LXII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१४ चा महा.२९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

**१.** या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (९) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— २०१४ चा महा.२९.

"(९-क) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम ७६ अन्वये घटित केलेला महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, असा आहे.". २०१७ चा महा.६.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, खंड (छ) मधील, " वित्त अधिकारी" या मजकुराऐवजी, "वित्त व लेखा अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ मध्ये नवीन कलम १४क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

प्र-कुलगुरू.

"**१४क.** (१) प्र-कुलगुरू हा, संपूर्ण विद्यापीठावर कार्यकक्षा असणारा कुलगुरूनंतरचा, विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी असेल.

(२) प्र-कुलगुरू ही, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील कोणत्याही विद्यापीठातील किंवा परिसंस्थेतील प्राध्यापक म्हणून किमान दहा वर्षांचा अनुभव असलेली अथवा शैक्षणिक नेतृत्व सिद्ध केल्याच्या पुराव्यासह तंत्र शिक्षण क्षेत्रातील दहा वर्षांचा शैक्षणिक किंवा प्रशासकीय अनुभव असलेली, विख्यात शिक्षणतज्ज्ञ व्यक्ती असेल;

(३) प्र-कुलगुरू हा, विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांचा व समित्यांचा आणि परिषदांचा पदसिद्ध सदस्य असेल.

(४) प्र-कुलगुरू हा, विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल आणि तो, थेट कुलगुरूचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांखाली काम करील.

(५) अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, त्याला अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते तसेच त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाकडून, वेळोवेळी, निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) कार्यकारी परिषद, कुलगुरूशी विचारविनिमय करून, विद्यापीठासाठी प्र-कुलगुरूची नियुक्ती करील.

(७) प्र-कुलगुरूचा पदावधी, कुलगुरूच्या पदाच्या पदावधीशी समव्यापी असेल किंवा तो, वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.

(८) जर राज्याच्या एकत्रीकृत निधीतून मानधन मिळणाऱ्या व्यक्तीची, किंवा जर संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्राचार्याची किंवा विद्यापीठाच्या अध्यापकाची प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती केलेली असेल तर, त्याच्या सेवेच्या अटी व शर्तीमध्ये प्र-कुलगुरू म्हणून त्याच्या पदावधीत त्याचे अहित होईल अशा प्रकारे फेरबदल करण्यात येणार नाहीत.

(९) प्र-कुलगुरू हा, कुलगुरूच्या अनुपस्थितीत, प्राधिकरणांचा, मंडळांचा व समित्यांचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(१०) जेव्हा प्र-कुलगुरूचे पद रिक्त होईल तेव्हा किंवा जेव्हा प्र-कुलगुरु, आजारपण किंवा अनुपस्थिती किंवा इतर कोणतेही कारण यामुळे त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, कुलगुरूस, प्र-कुलगुरू पदावर परत रुजू होईपर्यंत, किंवा यथास्थिति, नवीन प्र-कुलगुरू पद ग्रहण करीपर्यंत, प्र-कुलगुरू म्हणून स्थानापन्न करण्याकरिता, प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त असलेल्या योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

(११) प्र-कुलगुरूस, त्याच्या सहीनिशी कुलगुरूला उद्देशून लिहिलेली एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापासून तो, त्याचे पद धारण करण्याचे बंद करील.

(१२) प्र-कुलगुरू,—

(क) वेडा झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले आहे; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल न्यायालयाकडून त्याला दोषसिद्ध ठरविण्यात आले आहे; किंवा

(ग) तो, अमुक्त नादार झाला आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले आहे; किंवा

(घ) तो, दीर्घकाळच्या आजारामुळे किंवा विकलांगतेमुळे त्याची कार्ये पार पाडण्यास शारीरिकदृष्ट्या अपात्र व अक्षम झाला आहे; किंवा

(ङ) त्याने, अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्यास जाणीवपूर्वक वर्जिलेले आहे किंवा पालन करण्यास नाकारले आहे अथवा सेवेच्या कोणत्याही अटींचा व शर्तींचा भंग केला आहे किंवा पोट-कलम (४) अन्वये राज्य शासनाने विहित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला आहे किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरूपयोग केला आहे किंवा जर त्याला प्र-कुलगुरू पदावर पुढे चालू ठेवले तर, विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानीकारक आहे; किंवा

(च) तो, कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य आहे, अथवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात भाग घेत आहे, किंवा त्याच्या मदतीसाठी वर्गणी देत आहे, अशी खात्री पटली असेल तर, कार्यकारी परिषद, कुलगुरुच्या शिफारशीवरून प्र-कुलगुरुला त्याच्या पदावरून दूर करू शकेल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी, कोणताही पक्ष राजकीय पक्ष आहे किंवा कसे, अथवा कोणतीही संघटना, राजकारणात भाग घेते किंवा कसे अथवा कोणतीही चळवळ किंवा कार्य, या खंडाच्या व्याप्तीमध्ये येते किंवा कसे, यासंबंधातील कुलगुरूचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, कुलगुरु, खंड (घ), (ङ) व (च) अन्वये प्र-कुलगुरूला त्याच्या पदावरून दूर करण्यापूर्वी, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देईल.

(१३) प्र-कुलगुरू,—

(क) विद्यापीठाचे पदव्युत्तर अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यक्रम आणि सहयोगी कार्यक्रम यांसह विद्याविषयक विकास कार्यक्रमांचा प्रधान विद्याविषयक नियोजन व विद्याविषयक लेखा परीक्षा अधिकारी असेल;

(ख) विद्यापीठाकडून शिक्षणात आणि केंद्रीय शैक्षणिक सेवांमध्ये गुणवत्ता राखली जात आहे याची सुनिश्चिती करील;

(ग) विद्यापीठात बौद्धिक परस्पर संवाद वाढविण्यासाठी आणि संशोधन व विकास आणि उद्योग यांत सहचार्य आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी जबाबदार असेल;

(घ) विद्यापीठाच्या आणि त्यांच्या महाविद्यालयांच्या, शैक्षणिक कार्यक्रमांमधील, त्यांच्या दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या विकास योजनांची, संबंधित प्राधिकरणे, संस्था, समित्या व अधिकारी यांच्यामार्फत यथोचितरीत्या कार्यवाही व अंमलबजावणी केली जात आहे याची सुनिश्चिती करील;

(ङ) विद्यापीठाची प्रशाला, विभाग, उच्च अध्ययन परिसंस्था, संशोधन व विशेषीकृत अभ्यास, उत्कृष्टता केंद्र, नवोपक्रम व नवसंशोधन केंद्र, ज्ञान संसाधन केंद्र, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य वाढविणे, शैक्षणिक सेवा युनिटे, ग्रंथालये, प्रयोगशाळा व वस्तुसंग्रहालये यांच्या आस्थापनेकरिता कार्यकारी परिषदेकडे प्रस्तावांची शिफारस करील ;

(च) विद्यापीठाच्या सहयोगी व विकासविषयक कार्यक्रमांसाठी निधी गोळा करण्याकरिता, बाह्य निधी पुरवठा अभिकरणांबरोबर प्रधान संपर्क अधिकारी म्हणून काम करील आणि त्याच्या योग्य विनियोगावर नियंत्रण ठेवील;

(छ) विद्यापीठ, महाविद्यालये आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंस्था आणि वैज्ञानिक, औद्योगिक व वाणिज्यिक संघटना यांच्यामध्ये सहयोग वाढविण्यासाठी व त्यास प्रोत्साहन देण्यासाठी संपर्क प्रस्थापित करण्याकरिता जबाबदार असेल;

(ज) या अधिनियमाअन्वये विहित केलेल्या किंवा कुलगुरूने वेळोवेळी त्यास नेमून दिलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.”.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १९ ऐवजी दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वित्त व लेखाअधिकारी.

"**१९.** (१) वित्त व लेखा अधिकारी हा, विद्यापीठाचा प्रधान वित्त, लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल. तो, पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल आणि तो, थेट कुलगुरूच्या अधीक्षणाखाली, निदेशनाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(२) वित्त व लेखा अधिकारी ही, पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतका व्यावसायिक अनुभव असलेली सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल व्यक्ती असेल.

(३) पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती केली जाऊ शकत नसल्यास, उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण करणाऱ्या राज्य वित्त व लेखा सेवेतील शासकीय अधिकाऱ्यांमधून वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरूकडून वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

(५) वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती, पाच वर्षांच्या मुदतीसाठी किंवा त्याचा नियत सेवावधी पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे आधी घडेल त्या मुदतीसाठी असेल आणि तो, त्या प्रयोजनासाठी घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून त्या विद्यापीठात केवळ पाच वर्षांच्या आणखी एका मुदतीसाठी, निवडीद्वारे, पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल.

(६) वित्त व लेखा अधिकारी,—

(क) विद्यापीठाच्या निधीवर सर्वसाधारण देखरेख ठेवील आणि विद्यापीठाच्या वित्तव्यवस्थेसंबंधात कुलगुरूला सल्ला देईल;

(ख) विद्यापीठाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कुलगुरूच्या मान्यतेने, विश्वस्तव्यवस्था व दान केलेली मालमत्ता यांसह निधी, मालमत्ता व गुंतवणुका धारण करील व त्यांचे व्यवस्थापन करील;

(ग) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च, विद्यापीठाने निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होत नाही आणि तसेच, नियतवाटप करावयाच्या सर्व रकमा, ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेल्या आहेत किंवा नियतवाटप करण्यात आलेल्या आहेत त्याच प्रयोजनांसाठी त्या खर्च केल्या जातात, याची खात्री करील;

(घ) रोख रक्कम व बँकेतील शिल्लक रकमा व गुंतवणुका यांच्या स्थितीवर लक्ष ठेवील;

(ङ) महसूल वसुलीच्या प्रक्रियेवर व प्रगतीवर लक्ष ठेऊन प्रभावी महसूल व्यवस्थापन केले जात असल्याची सुनिश्चिती करील आणि त्यासंबंधात अनुसरन करावयाच्या पद्धतींबाबत कुलगुरूला सल्ला देईल;

(च) महाराष्ट्र विद्यापीठ वित्त व लेखा संहितेनुसार खंड (क) ते (ङ) खालील कर्तव्ये पार पाडील;

(छ) विद्यापीठाच्या लेख्यांची नियमितपणे लेखापरीक्षा करून घेईल;

(ज) इमारती, जमीन, साधनसामग्री, यंत्रसामग्री व इतर मत्ता यांच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवल्या जात आहेत आणि तसेच विद्यापीठांची सर्व कार्यालये, संचालित महाविद्यालये, कार्यशाळा व भांडारे यांमधील या मत्तांची व इतर उपभोग्य साहित्याची नियमितपणे प्रत्यक्ष पडताळणी केली जात आहे आणि त्यांचा मेळ घातला जात आहे यांची खात्री करील;

(झ) अनधिकृत खर्च किंवा इतर वित्तीय अनियमितता याबद्दल सहायक कुलसचिवाच्या दर्जाच्या किंवा त्याच्या समकक्ष व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या, विद्यापीठाच्या कोणत्याही विद्याविषयक सदस्याकडून किंवा दीर्घ सुट्टीवर नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्गाकडून किंवा अधिकाऱ्याकडून स्पष्टीकरण मागण्यात यावे, असे कुलगुरूकडे प्रस्तावित करील;

(ञ) विद्यापीठाचे अध्यापक, दीर्घ सुट्टीवर नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि सहायक कुलसचिवाच्या दर्जाचा किंवा त्याच्या समकक्ष व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी यांव्यतिरिक्त विद्यापीठाच्या कोणत्याही अध्यापकेतर सदस्याकडून कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील अनधिकृत खर्च किंवा अनियमितता यांबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे, असे कुलसचिवाला प्रस्तावित करील, आणि कसूरदार व्यक्तींवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करील;

(ट) त्याच्या वित्तीय जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी कोणतेही कार्यालय, केंद्र, प्रयोगशाळा, संचालित महाविद्यालय, विद्यापीठाचा विभाग किंवा विद्यापीठाची परिसंस्था यांच्याकडून त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही माहिती व विवरणे मागवील;

(ठ) वित्त व लेखा समितीच्या बैठकींची कार्यवृत्ते ठेवील;

(ड) वित्त व लेखा समितीला आणि कार्यकारी परिषदेला वार्षिक वित्तीय अंदाज पत्रके (अर्थसंकल्प), लेख्यांचे विवरणपत्र व लेखापरीक्षा अहवाल सादर करून उपार्जित तत्त्वावर दुहेरी नोंद लेखांकन प्रणालीद्वारे लेखे तयार करण्यास आणि ते ठेवण्यास जबाबदार असेल;

(ढ) विद्यापीठाची विविध प्राधिकरणे किंवा मंडळे, राज्य शासन, केंद्र सरकार, केंद्रीय शिक्षण आयोग किंवा परिषदा, विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद आणि विद्यापीठाला निधी पुरविणारी अशी कोणतीही संस्था यांनी मागणी केलेले वित्तीय अहवाल तयार करील ;

(ण) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये विहित केलेल्या किंवा कुलगुरूने त्याला वेळोवेळी नेमून दिलेल्या अशा अन्य अधिकारांचा वापर करील आणि अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.”.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २० ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाचे कलम २० वगळण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (एकोणीस) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(एकोणीस) विद्यापीठाच्या वतीने कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, विक्रीद्वारे, भाडेपट्ट्याद्वारे किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करणे.

परंतु, स्थावर मालमत्तेचे विक्रीद्वारे, भाडेपट्ट्याद्वारे किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करण्याच्या बाबतीत, राज्य शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असेल;";

(दोन) खंड (चव्वेचाळीस) मधील, "वित्त अधिकारी" या मजकुराऐवजी, "वित्त व लेखा अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मधील, पोट-कलम (११) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, इमारत बांधणी, बांधकाम, देखभाल, दुरुस्ती व खरेदी यासह वित्तीय व्यवहारांसंबंधीचे वित्तीय अधिकार, प्राधिकार, प्रणाली व प्रक्रिया ही, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) अन्वये काढलेल्या एकरूप परिनियमांन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेनुसार असतील.".

२०१७ चा महा. ६.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) विद्यापीठ, विशेषतः, विद्यापीठाच्या अधिकारीतेमधील सेवारहित व अल्प विकसित क्षेत्राच्या गरजांचा योग्य तो विचार करून, अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र शिक्षणाच्या सुविधांचे समन्यायी वाटप करण्याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने, महाविद्यालयांची व परिसंस्थांची स्थाने निश्चित करण्यासाठी प्रत्येक पाच वर्षांकरीता एक व्यापक सम्यक योजना तयार करील आणि ती, आयोगाकडून मान्य करून घेईल. अशी योजना, विद्यापीठाच्या नियोजन, मूल्यमापन व संनियंत्रण मंडळाकडून तयार करण्यात येईल, आणि ती, विद्यापरिषदेसमोर व कार्यकारी परिषदेसमोर ठेवण्यात येईल आणि आवश्यक असल्यास, ती प्रत्येक वर्षी अद्ययावत करण्यात येईल. आयोग, सम्यक योजनेत वेळोवेळी फेरबदल करील.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ मध्ये ८६क व ८६ख ही नवीन कलमे समाविष्ट करणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८६ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

लोकपाल.

"**८६क.** (१) केंद्र सरकारने, राज्य शासनाने किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाने व्यवस्थापित केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठाचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या सर्व प्रकारच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी विद्यापीठात एक लोकपाल असेल.

(२) लोकपाल, राज्य शासन व त्याचे अधिकारी यांच्याविरुद्धच्या गाऱ्हाण्यांचे आणि विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारितेत येणाऱ्या गाऱ्हाण्यांचे निवारण करणार नाही व त्यावर निर्णय घेणार नाही.

(३) कुलगुरू, लोकपाल म्हणून नियुक्ती करण्यासाठी, जिल्हा न्यायाधीशांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या तीन सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या नामिकेची राज्य शासनाच्या विचारार्थ, शिफारस करील.

(४) राज्य शासन, कुलगुरूने शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेत समाविष्ट असलेल्या एका व्यक्तीची विद्यापीठासाठी लोकपाल म्हणून नियुक्ती करील.

(५) लोकपालाची, त्याने पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी नियुक्त करण्यात येईल आणि तो, आणखी एका मुदतीसाठी पुनर्नियुक्तीस पात्र असेलः

परंतु, लोकपाल, सत्तर वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर पद धारण करणार नाही.

(६) राज्य शासन, गैरवर्तणुकीचा किंवा गैरव्यवहाराचा दोषारोप सिद्ध झाल्यावर लोकपालाला त्याच्या पदावरून काढून टाकू शकेल.

(७) उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या व्यक्तीद्वारे या संबंधात चौकशी केल्याशिवाय आणि लोकपालाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, लोकपालास पदावरून काढून टाकण्याचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(८) लोकपाल, विद्यापीठाकडून निर्धारित करण्यात येईल असे पारिश्रमिक व वाहनभत्ता मिळण्यास हक्कदार असेल;

(९) लोकपाल, दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या गाऱ्हाण्यांवर निर्णय घेईल;

(१०) लोकपाल, व्यवहार्य असेल तेथवर, तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, कायद्यानुसार गाऱ्हाण्यांची सुनावणी करील, समझोता करील व त्यावर निर्णय देईल.

(११) विद्यापीठ, लोकपालाला प्रशासकीय साहाय्य पुरविण्यासाठी सहायक कुलसचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा विद्यापीठाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली एक कक्ष स्थापन करील.

"**८६ख.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी,— अपिलाचा हक्क.

(क) या अधिनियमान्वये नामनिर्देशित केलेल्या लोकपालाच्या निर्णयामुळे व्यथित झालेला कोणताही पक्षकार; किंवा

(ख) केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून व्यवस्थापन करण्यात येत असेल व चालविण्यात येत असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमान्वये नियमन केलेल्या कोणत्याही विद्यापीठातील अथवा यापैकी कोणत्याही विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील, ज्याला बडतर्फ केले असेल किंवा पदावरून काढून टाकले असेल किंवा अन्यथा ज्याची सेवा समाप्त केली असेल किंवा ज्याला सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा ज्याला पदावनत केले असेल आणि जो व्यथित झाला असेल अशा कोणताही अध्यापकास किंवा अन्य कर्मचाऱ्यास, अपील करण्याचा हक्क असेल आणि अशा कोणत्याही आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध केलेले कोणतेही अपील, न्यायाधिकरणाकडे दाखल करण्यात येईल.

(ग) केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा त्यांच्या संबंधित व्यवस्थापनांकडून व्यवस्थापन करण्यात येत असेल व चालविण्यात येत असेल त्या व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांमधील आणि विद्यापीठाशी संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त संस्थांच्या कर्मचाऱ्यांमधील विवादांचा अभिनिर्णय करण्यासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम ८० च्या तरतुदींअन्वये तरतूद केलेले विद्यापीठाचे न्यायाधिकरण असेल.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ८७ ऐवजी दाखल करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

विद्यापीठ निधी.

"**८७.** (१) विद्यापीठ, पुढील निधी स्थापन करील :—

(क) सर्वसाधारण निधी;

(ख) वेतन निधी, -

(एक) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सर्व पदांकरिता;

(दोन) इतर सर्व पदांकरिता, स्वतंत्रपणे;

(ग) विश्वस्त निधी;

(घ) विकास व कार्यक्रम निधी;

(ङ) आकस्मिकता निधी;

(च) विद्यापीठाच्या मते, स्थापन करणे आवश्यक असेल असा इतर कोणताही निधी.

(२) पुढील रकमा, सर्वसाधारण निधीचा भाग असतील, किंवा त्यामध्ये त्यांचा भरणा करण्यात येईल :—

(क) केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेले वेतनेतर अंशदान किंवा अनुदान;

(ख) शुल्क, इतर शुल्क व आकार यांमधून मिळणाऱ्या उत्पन्नासह, अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेले विद्यापीठाचे सर्व उत्पन्न;

(ग) राज्य शासनाच्या परवानगीने बँकांकडून किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाकडून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ;

(घ) अन्य कोणत्याही मार्गाने किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या रकमा.

(३) केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या सर्व रकमांचा अथवा वेतन व भत्ते यांच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रदानापोटी मिळालेल्या इतर कोणत्याही स्थायी दानाचा किंवा अंशदानाचा वेतन निधीमध्ये समावेश होईल. या निधीमधील कोणत्याही रकमेचा, वेतन व भत्ते प्रदान करण्याच्या प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी वापर करण्यात येणार नाही.

(४) विश्वस्त व्यवस्था, मृत्युपत्रित दान, देणग्या, स्थायी दाने, अर्थसहाय्ये व तत्सम अनुदाने यांपासून मिळणारे सर्व उत्पन्न किंवा पैसा यांचा मिळून विश्वस्त निधी होईल.

(५) (क) विद्यापीठाच्या विकास व कार्यक्रम निधीमध्ये, राज्य शासनाकडून मिळालेली सर्व पायाभूत विकास अनुदाने, विकास व संशोधन यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेली सर्व अंशदाने आणि केंद्र सरकारची इतर निधी पुरवठा अभिकरणे, संयुक्त राष्ट्रे व त्यांच्या संलग्न संस्था, इतर आंतरराष्ट्रीय अभिकरणे, उद्योग, बँका व वित्त संस्था किंवा इतर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून मिळालेली अनुदाने यांचा समावेश होईल.

(ख) या निधीमधील कोणत्याही रकमेचे, विद्यापीठाच्या इतर कोणत्याही निधीसाठी विनियोजन करण्यात येणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती खर्च करण्यात येणार नाही.

(ग) विकास व कार्यक्रम निधी, वित्त पुरवठा करणाऱ्या अभिकरणाच्या कार्यक्रमांच्या उद्दिष्टांशी सुसंगत असेल अशा रीतीने आणि खर्च व लेखापरीक्षा यांवरील त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वापरण्यात येईल. आणि त्यास व्यवस्थापन परिषदेकडून मंजुरी व मान्यता देण्यात येईल.

(६) विद्यापीठाकडे विद्यापीठ लेख्यांच्या स्वतंत्र शीर्षाखाली एक आकस्मिकता निधी असेल व ते तो ठेवील आणि कोणताही अकल्पित खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठीच केवळ त्याचा वापर करण्यात येईल.

(७) पूर्वोक्त प्रयोजनांसाठी जिचा तात्काळ किंवा कोणत्याही नजिकच्या दिनांकाला वापर करता येणार नसेल अशी, या निधीच्या जमाखाती असलेली अतिरिक्त रक्कम, त्यातून उपार्जित होणाऱ्या रकमांसह वेळोवेळी राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकांमध्ये जमा करण्यात येईल अथवा ज्यात राज्य शासनाचा वित्तीय सहभाग असणाऱ्या महामंडळांनी काढलेल्या इतर कोणत्याही समभागांमध्ये किंवा रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ८८ व ८९ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाची कलमे ८८ व ८९ वगळण्यात येतील.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ९० ऐवजी दाखल करणे.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९० ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वार्षिक वित्तीय अंदाजपत्रक (अर्थसंकल्प).

"**९०.** (१) आगामी वित्तीय वर्षाकरिता विद्यापीठाची वार्षिक वित्तीय अंदाजपत्रके (अर्थसंकल्प), कार्यकारी परिषदेने केलेल्या शिफारशींनुसार वित्त व लेखा समितीच्या निदेशाअन्वये वित्त व लेखा अधिकाऱ्यांकडून वित्तीय वर्ष सुरू होण्यापूर्वी किमान दोन महिने आधी तयार करण्यात येतील.

(२) त्यानंतर, वित्त व लेखा अधिकारी, कार्यकारी परिषदेने मान्य केलेल्या वार्षिक वित्तीय अंदाजपत्रकाच्या (अर्थसंकल्पाच्या) प्रती कुलपतीला, आयोगाला व राज्य शासनाला पाठवील.

(३) राज्य शासनाचे जे वित्तीय वर्ष असेल तेच विद्यापीठाचे वित्तीय वर्ष असेल.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ९१ ऐवजी दाखल करणे.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९१ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल.

२०१७ चा महा. ६.

"**९१.** (१) विद्यापीठाचे लेखे, दुबार नोंद लेखांकन पद्धतीच्या आधारे व तत्त्वांवर ठेवण्यात येतील, आणि अनुसरावयाची लेखांकन पद्धती, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) अन्वये काढलेल्या एकरूप परिनियमांन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे अनुपालन करणारी व्यापारी लेखांकन पद्धती असेल.

(२) विद्यापीठाच्या लेख्यांची, दरवर्षी किमान एकदा आणि कोणत्याही परिस्थितीत वित्तीय वर्ष संपल्यापासून चार महिन्यांच्या आत, ज्यांच्या भागीदारांचा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांमध्ये किंवा कामकाजामध्ये कोणताही हितसंबंध नाही अशा सनदी लेखापालांच्या फर्ममधून कार्यकारी परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षा करण्यात येईल. विद्यापीठ, लेखापरीक्षा अहवाल मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखापरीक्षा अहवालात दर्शविलेल्या शेऱ्यांचे व विसंगतींचे अनुपालन करील. लेखापरीक्षा केलेले लेखे, विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि त्याची एक प्रत, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या प्रतीसह, वित्तीय वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत, कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल.

(३) लेखापरीक्षा केलेले लेखे विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि त्याची एक प्रत, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या व अनुपालन अहवालाच्या प्रतीसह कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल आणि वित्तीय वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत, मान्यतेसाठी कार्यकारी परिषदेपुढे सादर करण्यात येईल.

(४) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेले विद्यापीठाचे लेखापरीक्षा केलेले वार्षिक लेखे, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

(५) राज्य शासन, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची नियमित कालांतराने चाचणी लेखापरीक्षा किंवा संपूर्ण लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ९२ ऐवजी दाखल करणे.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९२ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वार्षिक अहवाल.

"**९२.** (१) विद्यापीठाच्या, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालयांच्या व परिसंस्थांच्या प्रशासकीय, विद्याविषयक, संशोधन व विकास आणि इतर कार्यक्रम यांची माहिती देणारा प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल, कार्यकारी परिषदेच्या निदेशनाखाली तयार करण्यात येईल. कार्यकारी परिषदेकडून मान्यता मिळालेला अहवाल, शैक्षणिक वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत, कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल.

(२) वार्षिक अहवाल, राज्य शासनाकडून राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ९४ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९४ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) राज्य शासनास, राज्य शासनाच्या उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत कोणतेही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा विद्यापीठ यांची चौकशी किंवा तपासणी करविण्याचा हक्क असेल;".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ यामध्ये नवीन कलम ९५क समाविष्ट करणे.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्याचा शासनाचा अधिकार.

"**९५क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर परिस्थितीनुसार तशी आवश्यकता असेल आणि राज्य शासनास तसे करणे आवश्यक वाटत असेल तर, परीक्षा व मूल्यमापनाशी संबंधित असलेल्या कामासाठी कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी किंवा विशेष कार्य अधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी एका वेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल आणि एकूण मिळून तीन वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करता येईल.".

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या अनुसूची-एक ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये,—

(१) अनुक्रमांक २ येथील नोंदीमध्ये, "पुणे विद्यापीठ, पुणे" या मजकुराऐवजी, "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) अनुक्रमांक ९ येथील नोंदीमध्ये, "उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव" या नोंदीऐवजी, "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) अनुक्रमांक १० येथील नोंदीमध्ये, "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर" या नोंदीऐवजी, "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये,-

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या अनुसूची-दोन ची सुधारणा.

(क) स्तंभ (१) मधील,—

(एक) “औरंगाबाद” या मजकुराऐवजी, “छत्रपती संभाजीनगर” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) “अहमदनगर” या मजकुराऐवजी, “अहिल्यानगर” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) “उस्मानाबाद” या मजकुराऐवजी, “धाराशिव” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) स्तंभ (२) मधील, “पुणे विद्यापीठ” हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे, त्याऐवजी, “सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ग) स्तंभ (३) मधील,—

(एक)"उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव" या मजकुराऐवजी, "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन)"सोलापूर विद्यापीठ, सोलापूर" या मजकुराऐवजी, "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ ( २०१४ चा महा. २९ ) हा, महाराष्ट्र राज्यात तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना करणे व त्याचे विधीसंस्थापन करणे यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियमित करण्यात आला आहे.

२. उक्त विद्यापीठाच्या प्रभावी विद्याविषयक प्रशासनासाठी व सुरळीत कामकाजासाठी आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ( २०१७ चा महा. ६ ) या खालील अन्य सार्वजनिक विद्यापीठांना लागू असलेल्या तरतुदींशी अनुरुप तरतुदी असण्यासाठी उक्त अधिनियमात विवक्षित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. उक्त अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

( एक ) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम ७६ अन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या तरतुदी, या अधिनियमाला लागू करणे.

( दोन ) वित्त अधिकारी या पदाचे नाव बदलून वित्त व लेखा अधिकारी असे करणे.

( तीन ) वित्त व लेखा अधिकाऱ्याची भूमिका, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि त्यास द्यावयाचे अधिकार विनिर्दिष्ट करणे.

( चार ) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ अन्वये केलेल्या एकरूप परिनियमांन्वये विहित केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेच्या तरतुदी लागू करणे.

( पाच ) विद्यापीठाने तयार केलेल्या सम्यक योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी तिला आयोगाची मान्यता घेण्याची तरतूद करणे.

( सहा ) केंद्र सरकारने, राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने व्यवस्थापित केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठाचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे व मान्यताप्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या सर्व प्रकारच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी लोकपाल नियुक्त करणे.

( सात ) लोकपालाच्या निर्णयाविरुद्ध अपिलाची तरतूद करणे.

( आठ ) विद्यापीठाच्या विविध निधींच्या व त्याच्या वापराच्या तरतुदींमध्ये स्पष्टता आणणे.

( नऊ ) वित्त व लेखा अधिकारी, कार्यकारी परिषदेने केलेल्या शिफारशींच्या अनुरूप व दिलेल्या मान्यतेनुसार वित्त समितीने दिलेल्या निदेशांनुसार वार्षिक वित्तीय अंदाजपत्रक ( अर्थसंकल्प ) तयार करील अशी तरतूद करणे.

( दहा ) विद्यापीठाचे लेखे, दुबार नोंद लेखांकन पद्धतीच्या आधारे व तत्त्वांवर ठेवण्यात येतील आणि राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून नियमित कालांतराने विद्यापीठांच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा किंवा संपूर्ण लेखापरीक्षा करणे शासनास शक्य होईल.

( अकरा ) राज्य शासनास, राज्य शासनाच्या उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत, कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठाची चौकशी किवा तपासणी करणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ८ जुलै २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ६२-डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट

### (डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यातील उतारे)

### (सन २०१४ चा महाराष्ट्र क्रमांक २९)

**१.** ते **८.** *** *** ***

**९.** विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाचे अधिकारी.

(क) ते (च) *** *** ***

(छ) वित्त अधिकारी;

(ज) ते (ञ) *** *** ***

**१०.** ते **१८.** *** *** ***

**१९.** वित्त अधिकारी हा विद्यापीठाचा पूर्णकालिन वेतनी अधिकारी असेल आणि वित्त समितीचा किंवा वित्त समितीने स्थापन केलेल्या समितीचा पदसिद्ध सचिव म्हणून काम करील परंतु त्याला वित्त समितीचा सदस्य असल्याचे मानण्यात येणार नाही. वित्त अधिकारी.

**२०.** (१) वित्त अधिकाऱ्याची नियुक्ती, परिनियम विहित केल्यानुसार निवडसमितीच्या शिफारशीवरून कार्यकारी परिषदेकडून करण्यात येईल. त्याची अर्हता, वित्तलब्धी व सेवेच्या अटी व शर्ती परिनियमाव्दारा विहित करण्यात येईल अशा असतील. वित्त अधिकाऱ्यांची नियुक्ती, त्याची कर्तव्ये व अधिकार.

(२) वित्त अधिकाऱ्याची नियुक्ती ही पाच वर्षाच्या कालावधीसाठी असेल आणि तो पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल :

परंतु असे की, कोणतीही व्यक्ती वयाच्या ६० वर्षानंतर वित्त अधिकाऱ्याचे पद धारण करणार नाही.

(३) जेव्हा वित्त अधिकाऱ्याचे पद रिक्त असेल तेव्हा किंवा जेव्हा वित्त अधिकारी आजारपणाच्या कारणामुळे किंवा अनुपस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे त्याचे पदीय कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी किंवा वित्त अधिकाऱ्याची यथोचित नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत. कुलगुरू त्या प्रयोजनासाठी त्या त्या वेळी नियुक्त करील अशा व्यक्तीद्वारे अशी कर्तव्ये पार पाडण्यात येतील.

(४) वित्त अधिकारी कुलगुरूला वित्तीय बाबतीत सहाय्य करील आणि तो कुलगुरूच्या सर्वसाधारण नियंत्रणाधीन असेल. वित्त अधिकारी, त्याचे अधिकार वापरताना व त्याची कर्तव्ये पार पाडताना :—

(क) विद्यापीठाच्या निर्धीवर सर्वसाधारण देखरेख ठेवील व विद्यापीठाच्या वित्तीय धोरणासंबंधात कुलगुरूला सल्ला देईल ;

(ख) विद्यापीठाच्या उद्दिष्टांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पुष्ट्यर्थ, विश्वस्तव्यवस्था व दान करण्यात आलेली मालमत्ता यांसह निधी, मालमत्ता व गुंतवणूका धारण करील व त्यांचे व्यवस्थापन करील;

(ग) वर्षातील आवर्ती व अनावर्ती खर्च विद्यापीठाने त्याबाबतीत निश्चित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होत नाही, तसेच नेमून दिलेल्या रकमा ज्यासाठी पैसे मंजूर करण्यात किंवा नेमून देण्यात आले असतील त्याच प्रयोजनांसाठी खर्च करण्यात येत आहेत याबद्दल खात्री करून घेईल ;

(घ) विद्यापीठाचे वार्षिक लेखे व अर्थसंकल्प तयार करण्यास किंवा ते पुढील वित्तीय वर्षी, तयार करण्यास आणि तो कार्यकारी परिषदेला सादर करण्यास जबाबदार असेल;

(ङ) रोख रक्कम व बँकेतील शिलका व गुंतवणुका यांच्या स्थितीवर लक्ष ठेवील ;

(च) उत्पन्नाच्या वसुलीच्या प्रगतीवर लक्ष ठेवील आणि वसुली करण्यासाठी अनुसरावयाच्या पद्धतींबाबत कुलगुरूला सल्ला देईल ;

(छ) विद्यापीठाच्या लेख्यांची नियमितपणे परीक्षा करून घेईल ;

(ज) इमारती, जमीन, साधनसामग्री व यंत्रसामग्री यांच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवल्या जात आहेत; तसेच विद्यापीठाची सर्व कार्यालये, महाविद्यालये, केंद्रे, संस्था प्रयोगशाळा, ग्रंथालये, कार्यशाळा व भांडारे यांमधील साधनसामग्री व इतर वापरले जाणारे साहित्य यांच्या साठ्याची नियमितपणे पडताळणी केली जात आहे, याबद्दल खात्री करून घेईल ;

(झ) कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील अनधिकृत खर्च किंवा अन्य वित्तीय अनियमितता यांबद्दल स्पष्टीकरण मागण्यात यावे असे कुलगुरूला सुचवील व कसूरदार व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करील;

(ञ) आपल्या वित्तीय जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल, अशी कोणतीही महिती व विवरणे कोणत्याही कार्यालयाकडून, महाविद्यालयांकडून, प्रयोगशाळेकडून, किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थेकडून मागवून घेईल ; आणि

(ट) कार्यकारी परिषदेकडून त्यास नेमून देण्यात आलेल्या किंवा संविधिद्वारे विहित करण्यात आलेल्या अशा इतर अधिकारांचा वापर करील व इतर कर्तव्ये, तसेच अशी इतर वित्तविषयक कामे पार पाडील.

**२१.** व **२८.** *** *** ***

कार्यकारी परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

**२९.** (१) या अधिनियमाच्या आणि परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, कार्यकारी परिषद पुढील अधिकाराचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) ते (अठरा) *** *** ***

(एकोणीस) विद्यापीठीच्यावतीने, कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, विक्रीद्वारे, पट्ट्याद्वारे किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करणे;

(वीस) ते (त्रेचाळीस) *** *** ***

(चव्वेचाळीस) कुलपतीच्या मान्यतेस अधीन राहून, आदेश करण्यासंबंधीचा अधिकार वगळून आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार, कुलगुरू, कुलसचिव किंवा वित्त अधिकारी यास किंवा तिला योग्य वाटतील अशा विद्यापीठाच्या इतर कोणत्याही प्राधिकरणास अथवा तिने नियुक्त केलेल्या समितीस प्रत्यायोजित करणे.

(२) व (३) *** *** ***

**३०.** ते **३३.** *** *** ***

वित्त समिती, तिची स्थापना व सभा घेण्याचा अधिकार.

**३४.** (१) ते (९) *** *** ***

(१०) नवीन पदे निर्माण करण्यासंबंधीचे, वेतनश्रेणींची पुनर्रचना व श्रेणीवाढ करण्यासंबंधीचे सर्व प्रस्ताव आणि अर्थसंकल्पात ज्यांचा समावेश करण्यात आलेला नाही अशा बाबी, कार्यकारी परिषदेने त्यावर विचार करण्यापूर्वी वित्त समितीकडून तपासल्या जातील.

(११) वित्त समितीचे अधिकार व कर्तव्ये व तिच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती परिनियमामध्ये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**३५.** ते **४७.** *** *** ***

**४८.** (१) विशेषतः विद्यापीठाच्या अधिकारीतेमधील सेवारहित आणि न्यून विकसित क्षेत्राच्या गरजांचा योग्य तो विचार करून, उच्च शिक्षणाच्या सुविधांचे समन्यायी वाटप होण्याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने, उच्चस्तर शिक्षणाच्या शैक्षणिक विकासाकरिता परिसंस्थांची आणि महाविद्यालयांची स्थाने निश्चित करण्यासाठी विद्यापीठ एक सम्यक योजना तयार करील आणि ती, राज्य उच्च शिक्षण परिषदेकडून मान्य करून घेईल. अशी योजना, विद्यापीठाच्या नियोजन, मूल्यमापन व संनियंत्रण मंडळाकडून तयार करण्यात येईल आणि ती योजना विद्यापरिषद आणि कार्यकारी परिषद यांच्यापुढे ठेवण्यात येईल आणि आवश्यक असल्यास, प्रत्येक वर्षी ती अद्ययावत करण्यात येईल. परवानगी संबंधीची कार्यपद्धती.

(२) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासंबंधीचा कोणताही अर्ज, जर अशा योजनेशी सुसंगत नसेल तर, विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

(३) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जाची, विद्यापीठाच्या नियोजन व मूल्यमापन (संनियंत्रण) मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने ते अर्ज कार्यकारी परिषदेला उचित वाटतील अशा शिफारशीसह (संबद्ध कारणांनी यथोचितरीत्या पुष्टी देऊन) त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी राज्य शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जापैकी राज्य शासन, त्याला त्याच्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार उचित व योग्य वाटतील अशा संस्थांना परवानगी देऊ शकेल व तसे करताना ते राज्य शासनाची अर्थसंकल्पीय साधनसंपत्ती, नवीन परिसंस्था सुरू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता आणि उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या स्थान निश्चयनासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम विचारात घेईल :

परंतु, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासन, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, प्रत्येक शैक्षणिक वर्षापासून, ज्या वर्षी नवीन महाविद्यालय सुरू करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या वर्षाच्या ३० जून रोजी किंवा त्यापूर्वी, विद्यापीठाला राज्य शासनाकडून अशी परवानगी मिळाल्याचे कळविण्यात येईल. त्यानंतर परवानगी प्राप्त झाल्यास विद्यापीठाकडून तिचा अंमल पुढील शैक्षणिक वर्षातच करण्यात येईल.

(६) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी राज्य शासन, कोणताही अर्ज विचारासाठी थेट दाखल करून घेणार नाही.

**४९.** ते **८६.** *** *** ***

**८७.** (१) विद्यापीठ " विद्यापीठ निधी " या नावाचा एक निधी प्रस्थापित करील. विद्यापीठ निधी.

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग बनतील किंवा त्या विद्यापीठ निधीत जमा करण्यात येतील :—

(क) राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने, विद्यापीठ अनुदान आयोगाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा अनुदान;

(ख) फी व आकार यापासून येणारे उत्पन्न आणि विक्रीपासून मिळणारे कोणतेही उत्पन्न असल्यास ते धरून, सर्व साधनांपासून येणारे विद्यापीठाचे उत्पन्न ; आणि

(ग) कोणतीही विश्वस्तव्यवस्था, अर्थसहाय्य, मृत्यूपत्रित व इतर देणग्या; स्थायीदाने, आणि इतर अनुदाने असल्यास यांपासून विद्यापीठाला मिळणारे सर्व उत्पन्न व पैसा.

(घ) राज्य शासनाच्या परवानगीने बँका किंवा इतर कोणत्याही अभिकरणाकडून कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम.

(३) विद्यापीठ निधी हा कार्यकारी परिषदेच्या स्वेच्छा निर्णयाने भारतीय स्टेट बँकेमध्ये किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ यांच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व बँकेने दिलेली अनुज्ञप्ती धारण करीत असलेल्या भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा विद्यापीठाच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत किंवा भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ ने प्राधिकृत केलेल्या रोख्यांमध्ये किंवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून भारतीय युनिट ट्रस्टमध्ये किंवा विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रयोजनासाठी स्थापना केलेल्या ग्राहक सहकारी संस्थांच्या शेअर्समध्ये किंवा त्यांना कर्ज देऊन गुंतविण्यात येईल.

आकस्मिकता निधी.

**८८.** विद्यापीठ, विद्यापीठाच्या लेख्यांमध्ये एका स्वतंत्र लेखा शीर्षाखाली एक आकस्मिकता निधी ठेवील. त्यामध्ये विशेषतः या प्रयोजनासाठी राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत वेळोवेळी दिलेली अंशदाने किंवा अनुदाने यांच्या रकमा जमा करण्यात येतील. प्रारंभिक खर्च भागविण्यासाठी आणि त्यानंतर अकल्पित खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी आगाऊ रकमा देण्याकरिता अंशा निधीचा वापर करण्यात येईल.

विशेष निधी आणि घसारा निधी.

**८९.** विद्यापीठास राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग वेळोवेळी, विद्यापीठाच्या लेख्यामध्ये एक विशेष निधी किंवा घसारा निधी म्हणून वेगळ्या लेखा शीर्षाखाली जमा करता येईल :

परंतु, अशा रीतीने असा वेगळा निधी ज्या उद्दिष्टासाठी उभारण्यात आला असेल त्याच्याशी स्पष्टपणे संबंधित असतील अशाच रकमा विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी किंवा परिनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल त्यानुसार साधनसामग्रीच्या घसाऱ्यासाठी अशा विशेष निधीमध्ये जमा करण्यात व खर्ची घालण्यात येतील.

वार्षिक वित्तीय अंदाज.

**९०.** (१) (क) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, विद्यापीठाला स्थैर्य प्राप्त होत असल्याच्या कालावधीत, विद्यापीठाने आपल्या जमा रकमेचे आणि खर्चाचे वार्षिक वित्तीय अंदाज ज्या तारखेपर्यंत व ज्या पद्धतीने तयार करावेत ती तारीख व पद्धती राज्य शासन विनिर्दिष्ट करील.

(ख) कार्यकारी परिषद अशा रीतीने तयार केलेले अंदाज विचारात घेईल आणि ते फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय मान्य करील आणि परिषदेकडून मान्य करण्यात आलेले असे अंदाज, राज्य शासनाकडे त्याच्या मंजुरीसाठी सादर करील.

(ग) राज्य शासनाला, उक्त अंदाजाच्या निर्देशासह, त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि ते विद्यापीठाला कळविता येतील व विद्यापीठ अशा आदेशाची अंमलबजावणी करील.

(२) (क) विद्यापीठाच्या स्थैर्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कुलगुरु, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी किंवा अशा तारखेस, विद्यापीठाच्या वित्त अधिकाऱ्यांकडून विद्यापीठाच्या जमा रकमा व खर्च यांचे आगामी वर्षासाठीचे वार्षिक वित्तीय अंदाज तयार करवून घेईल आणि वित्त समितीमार्फत ते कार्यकारी परिषदेकडे पाठवील.

(ख) अशा प्रकारे तयार करण्यात आलेल्या वित्तीय अंदाज़ांवर कार्यकारी परिषद विचार करील व त्यामध्ये फेरफार करून किंवा कोणतेही फेरफार न करता ते संमत करील.

**९१.** (१) वित्त अधिकारी, कुलगुरुच्या निदेशान्वये विद्यापीठाचे वार्षिक लेखे तयार करील व कोणत्याही मार्गाने विद्यापीठाकडे उपार्जित झालेला किंवा विद्यापीठाला मिळालेला पैसा तसेच विद्यापीठाकडून संवितरित करण्यात आलेल्या व देण्यात आलेल्या सर्व रकमा यांची नोंद त्या लेख्यांमध्ये करण्यात येईल. वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवाल.

(२) कुलगुरू, हे वार्षिक लेखे व ताळेबंद राज्य शासनाकडे सादर करील व राज्य शासन, ते भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून नियुक्त करील अशा लेखा परीक्षकाकडून या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेईल. लेखापरीक्षा करण्यात आल्यावर हे लेखे मुद्रित करण्यात येतील व कुलगुरूकडून, त्याच्या प्रती तसेच लेखापरीक्षा अहवालाच्या प्रती कार्यकारी परिषदेला व कुलपतीला सादर करण्यात येतील.

(३) कार्यकारी परिषद या लेख्यांची तसेच लेखापरीक्षा अहवालाची एक प्रत व त्या लेखापरीक्षा अहवालावर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाही संबंधातील निवेदन राज्य शासनला सादर करील आणि राज्य शासन ते, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील.

**९२.** विद्यापीठाचा वार्षिक अहवाल कार्यकारी परिषदेच्या निदेशान्वये विहित करण्यात येईल अशा तारखेला किंवा तत्पूर्वी तयार करण्यात येईल. कार्यकारी परिषदेकडून मान्यता मिळालेला अहवाल कुलगुरू, कुलपतीस व राज्य शासनास सादर करील. राज्य शासन, तो अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील. वार्षिक अहवाल.

**९३.** *** *** ***

**९४.** (१) राज्य शासनास, विद्यापीठाशी संबंधित अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात, ते निदेश देईल अशा एका किंवा अनेक व्यक्तींकडून चौकशी करविण्याचा हक्क असेल. विद्यापीठाशी संबंधित अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी करविण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

(२) ते (४) *** *** ***

**९५. ते १११.** *** *** ***

## अनुसूची–एक

[ कलम ४(२) व कलम १०९ पहा ]

| अनुक्रमांक (१) | विद्यापीठाचे नाव (२) |
|---|---|
| १ | *** *** *** |
| २ | पुणे विद्यापीठ, पुणे. |
| ३ ते ८ | *** *** *** |
| ९ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. |
| १० | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |
| ११. | *** *** *** |

## अनुसूची-दोन

[ कलम ४ ( ५ ) पहा ]

प्रादेशिक केंद्रे व उप-केंद्रे आणि त्यांची आधिकारिता क्षेत्रे—

जिल्हा-निहाय भौगोलिक स्थानानुसार संबंधित प्रादेशिक केंद्रे किंवा उप केंद्रे यांनुसार महाविद्यालये किंवा परिसंस्था पुढील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे सलग्न करण्यात येतील :—

| जिल्हे<br>(१) | प्रादेशिक केंद्रे<br>(२) | उप-केंद्रे<br>(३) |
|---|---|---|
| रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे. | . . . . | . . . . |
| मुंबई व मुंबई उपनगर | मुंबई विद्यापीठ, मुंबई. | . . . . |
| औरंगाबाद, बीड व जालना | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | . . . . |
| लातूर, परभणी, हिंगोली व नांदेड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. |
| धुळे, जळगाव व नंदुरबार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. |
| अहमदनगर, नाशिक व पुणे | पुणे विद्यापीठ. | . . . . |
| कोल्हापूर, सांगली व सातारा | पुणे विद्यापीठ. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| सोलापूर व उस्मानाबाद | पुणे विद्यापीठ. | सोलापूर, विद्यापीठ, सोलापूर. |
| नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | . . . . |
| अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | संत गाडगेबाबा अमरावती. विद्यापीठ, अमरावती. |

**अनुसूची- तीन.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२. ]**

**[ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव (१),

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.